# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.01.2025** **वारःसोमवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज जम्मू आणि काश्मिर ते लेहला जोडणाऱ्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन
2. पुढील 25 वर्षात युवा पिढी भारताला विकसित देश बनवेल पंतप्रधानांचा विश्वास
3. प्रयागराज इथं पहिल्या अमृतस्नानाने महाकुंभमेळयाची सुरुवात
4. महाराष्ट्रात नाशिक इथल्या अपघातात 6 जणांचा मृत्यू आणि 10 जण जखमी आणि
5. महिला क्रिकेटमध्ये दुसऱ्या सामन्यात भारताचा आयर्लंडवर 116 धावांनी विजय

**सोनमर्ग**

जम्मू काश्मीर मधल्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या बोगद्यामुळे लेह रस्त्यावरील श्रीनगर आणि सोनमर्ग दरम्यान वर्षभर सर्व ऋतूंमध्ये संपर्क निर्माण होईल. 12 किमी लांबीच्या सोनमर्ग बोगदा प्रकल्पासाठी 2 हजार 700 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला असून हा बोगदा भूस्खलन आणि हिमस्खलनप्रवण रस्त्यांना टाळून लडाखशी अखंड संपर्क निर्माण करणार आहे. यामुळे सोनमर्ग इथल्या हिवाळी पर्यटन, साहसी खेळ आणि स्थानिक उपजीविकेला प्रोत्साहन मिळेल. वाहनांचा वेग आता ताशी 30 किलोमीटरवरून ताशी 70 किलोमीटर होईल, आणि यामुळे श्रीनगर आणि लडाख दरम्यान वेगवान आणि अखंड संपर्क निर्माण होईल. या बोगद्यामुळे संरक्षण रसद वाढेल, तसंच आर्थिक प्रगती होऊन जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मता वृद्धिंगत होईल.

**पंतप्रधान**

भारतातील युवा शक्ती भविष्यात देशाला विकसित देश बनवेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. विकसित भारत युवा नेता संवाद या कार्यक्रमाला संबोधित करताना नवी दिल्ली इथं ते बोलत होते. पुढील 25 वर्षात देशाला नवा आकार देण्यात युवकांचं सामर्थ्य महत्वाची भुमिका बजावेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 12 जानेवारी हा दिवस युवादिन म्हणून साजरा करण्यात येतो या पार्श्वभूमीवर काल या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. तीन दिवसांचा विकसित भारत युवा संवाद या कार्यक्रमाची शुक्रवारी सुरू झाली, युवकांना विकसित भारतासाठी नाविन्यपूर्ण उपाय सादर करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करत आहे. या कार्यक्रमादरम्यान मोदी यांनी देशभरातील तीन हजार गतिमान युवा नेत्यांशी संवाद साधला. भारत अनेक क्षेत्रांमध्ये आपली उद्दिष्टे वेळेपूर्वीच पूर्ण करत आहे. यामुळे अल्पावधीत भारतीय अर्थव्यवस्था भरभराटीला येईल तसंच नवनवीन शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. असंही पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले.

**महाकुंभ**

श्रद्धा आणि मानवतेचा सर्वात मोठा संगम असलेला महाकुंभ आजपासून उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानाने भव्य आध्यात्मिक मेळाव्याची सुरुवात होईल. 26 फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकार्यक्रमात सहभागी होण्यासाठी लाखो लोक दाखल झाले आहेत. आज सकाळपासून 50 लाख भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिलं आहे. देशाच्या समृद्ध आणि चैतन्यशील संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या कलाग्रामचे उद्घाटन केंद्रीय

संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी काल संध्याकाळी प्रयागराज इथं केलं. पुढील 45 दिवसांत 14 हजार सहाशेहून अधिक कलाकार कलाग्राममध्ये सादरीकरण करतील. अशी माहिती शेखावत यांनी यावेळी बोलताना दिली.

प्रयागराजमध्ये होणारा महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा आहे, ज्यामध्ये 45 कोटींहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महाकुंभ नगरमधील मंदिरं आणि प्रमुख स्थळांवर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. या ठिकाणी सात थरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. पोलिसांनी पाण्याखालील ड्रोन आणि एआय-सक्षम कॅमेऱ्यांसह प्रगत तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. प्रयागराजला ये-जा करणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी भारतीय रेल्वेच्या तीन हजार 300 विशेष गाड्यांसह 10 हजारपेक्षा जास्त गाड्या धावत आहेत. पायाभूत सुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि इतर गोष्टींवर प्रशासनानं विशेष भर दिला आहे. अशी माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीने दिली आहे.

**इस्त्रो**

भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था अर्थात इस्त्रोनं स्पेडेक्स उपक्रमाअंतर्गत चेसर आणि टार्गेट हे दोन उपग्रह सुरक्षित अंतरावर अर्थात 3 मीटर अंतरावर आणण्यात यश मिळवलं आहे. या उपग्रहावर बसवण्यात आलेल्या कॅमेऱ्याने काढलेली छायाचित्र पाठवण्यास सुरुवात झाल्याची माहिती इस्त्रोनं समाजमाध्यमावरील संदेशात देण्यात आली आहे. डॉकिंग प्रक्रिया या उपग्रहाने पाठवलेल्या डाटाचं विश्लेषण केल्यानंतरच केली जाईल. असंही इस्त्रोनं स्पष्ट केलं आहे. या मोहिमेसाठी इस्रोने विकसित केलेले सर्व सेन्सर डॉकिंग प्रयोग करण्यापूर्वी पूर्णपणे कॅलिब्रेट आणि चाचणी करणे आवश्यक आहे. डॉकिंगनंतर, दोन्ही उपग्रह एकाच अंतराळयानाच्या स्वरूपात नियंत्रित केले जातील. इस्रोने विकसित केलेली स्वदेशी भारतीय डॉकिंग प्रणाली यशस्वी झाल्यास अमेरिका, रशिया आणि चीननंतर ही कामगिरी करणारा भारत हा जगातील चौथा देश असेल.

**अपघात-नाशिक**

महाराष्ट्रातील नाशिक शहरात मुंबई- आग्रा महामार्गावर काल झालेल्या अपघातात सहा जण ठार तर 10 जण गंभीर जखमी झाले आहेत. काल संध्याकाळी साडेसात वाजता द्वारका परिसरातल्या उड्डाणपुलावरून जाणारा टेम्पो पुढे लोखंडी सळया घेऊन जाणाऱ्या मालट्रकवर आदळल्यामुळे हा अपघात झाला. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातल्या धारणगावहून धार्मिक कार्यक्रमावरून नाशिकला परतणाऱ्या या टेंपोमधील भाविकांच्या शरीरात ट्रक मधील सळया शिरल्या असून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ठार झालेले सर्वजण नाशिक शहरातील रहिवासी होते.

**एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर आजासून 3 दिवसांच्या स्पेनच्या दौऱ्यावर आहेत. परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांचा हा पहिलाच स्पेन दौरा आहे. या भेटीदरम्यान ते स्पेनच्या उच्चपदस्थांची भेट घेणार असून त्यांचे समपदस्थ मॅन्युएल अल्बरेस यांच्या बरोबर द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक तसंच दोनही देशांसाठी महत्वाच्या जागतिक मुद्यांवर चर्चा करतील. ते स्पॅनिश राजदूतांच्या 9 व्या वार्षिक परिषदेला संबोधित करतील आणि भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत.

**भाजपा-अहिल्यानगर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधीपक्षांना एकही जागा मिळणार नाही असं नियोजन करण्याचं आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केलं. महाराष्ट्रातील शिर्डी इथं भारतीय जनता पार्टीच्या महाविजय अधिवेशनात ते काल बोलत होते. राज्याला अस्थिरतेतून बाहेर काढून एक मजबूत, स्थिर सरकार देण्याचं काम जनतेनं केलं, याविजयात लाडक्या बहीणींचा मोठा वाटा आहे, असंही अमित शहा म्हणाले. आपल्या भाषणात त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या जनतेनं अभूतपूर्व यश दिलंआहे. केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपाचं उद्दिष्ट आहे. असं केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते यावेळी

उपस्थित होते. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचं पूजन करण्यात आलं.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये राजकोट इथं झालेल्या मर्यादित षटकांच्या दुसऱ्या सामन्यात काल भारतानं आयर्लंडवर 116 धावांनी विजय मिळवला. आणि या तीन सामन्यांच्या या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली. काल नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 50 षटकात 5 खेळाडूंच्या मोबदल्यात 370 धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जनं शतकी खेळी केली. हरलीन देओल, स्मृती मंधना, प्रतिका रावल यांनीही चमकदार खेळी करत भारताच्या धावसंख्येत मोठी भर टाकली. 371 धावांचं हे मोठं लक्ष्य गाठताना आयर्लंडला 254 धावांच करता आल्या. या मालिकेतला तिसरा सामना येत्या 15 तारखेला होणार आहे.

**हवामान**

आज पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि पश्चिम राजस्थानच्या काही भागात थंडीची लाट राहील असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तरेकडील, पूर्वेकडील आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पुढील 2 दिवस सकाळी आणि रात्री दाट धुकं राहील. हवामान खात्याने उद्यापर्यंत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, तामिळनाडू, पुडुचेरी, कराईकल, केरळ आणि माहे मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील 2 दिवसांत वायव्य, मध्य आणि पश्चिम भारतात किमान तापमानात 2-3 अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.